# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट २८५-२२ दिनांक २७/०९/२०२२

## घातक शस्त्रासह दरोडा टाकणा-या टोळीतील आरोपीतांना जेरबंद करण्यात गुन्हे शाखा, कक्ष ३ विरार यांना यश.

-------00000-------

दिनांक २५/०९/२०२२ रोजी पहाटे ०४.०० वा ते ०७.०० वाजेच्या दरम्यान वज्रेश्वरी ते शिरसाड बाजुकडे जाणा-या रोडवर पारोळ नाका पासुन अंदाजे ५०० मीटर शिरसाड बाजुकडे, ता. वसई, फिर्यादी नामे राजकुमार रामआधार सिंग व ५५ वर्ष, धंदा ड्रायव्हर, रा. भास्करनगर, बाबाशिव शंकर चाळ, कळवा, ठाणे पुर्व हे त्यांच्या ताब्यातील ट्रेलर क्रमांक एम.एच.४८ ए.वाय.८७२४ या ट्रेलरमध्ये १७,२०,०००/- रुपये किंमतीचे २७ टन लोखंडी सळई व ३७० किलो एम.एस. बेंडीग लोखंडी वायर असे भरुन अंबाडी ते मुंबई असे जाण्यासाठी वज्रेश्वरी शिरसाड रोडने जात असतांना पाच अनोळखी इसमांनी त्यांच्या ताब्यातील चार चाकी कारने ट्रेलरला अडवून ट्रेलरमध्ये चढून त्यापैकी एका इसमाने गावठी कट्टा दाखवुन फिर्यादीचा जबरदस्तीने मोबाईल काढून धक्काबुक्की व मारहाण करुन फिर्यादीस ड्रायव्हरच्या मागील सिटवर झोपवुन तोंडवर कापड टाकुन ट्रेलर चालवुन घेवुन त्यांना वाटेत शिरसाड नाका ते विरार फाटा दरम्यान त्यांच्याकडील चारचाकी कारमध्ये जबरदस्तीने घालुन, डोळ्यावर पट्टी बांधुन, त्याच्या ताब्यातील मालाने भरलेला ट्रेलर असा ४२,२१,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल दरोडा टाकुन घेवुन गेले व फिर्यादी यांना खानिवडे टोलनाक्याच्या पुढे मुंबई बाजुकडे जाणा-या हायवेवर सोडले. सदर घटनेबाबत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन मांडवी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर १२१/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३९५ भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ प्रमाणे अज्ञात आरोपीत विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये वाहनांवर पडणा-या दरोड्याच्या घटनांची वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी गांभिर्याने दखल घेवुन सदर गुन्हयातील आरोपीत यांचा शोध घेवुन सदर गुन्हयांना प्रभावीपणे पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या. सदर गुन्हयाच्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त (गुन्हे), व सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा, कक्ष ३ विरारच्या पोलीस पथकाने वेगवेगळे पथक तयार करुन गुन्हयातील आरोपीत यांची तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने माहिती प्राप्त करुन गुन्हा घडल्याच्या ३६ तासाच्या आत सापळा रचुन आरोपीत नामे १) नौशाद अहमद मुस्ताक अहमद, वय २४ वर्षे, २) मोहमद समीर मोहम्मद जमील कुरेशी, वय २१ वर्षे, ३) मेहताब आलम नसरत अली, वय २९ वर्षे, ४) मोहम्मद दानिश मोहमंद वासिफ खान, वय २० वर्षे यांना दिनांक २६/९/२०२२ रोजी शिताफीने ताब्यात घेतले आहे. त्यांचे कडुन दोन अग्निशस्त्र व एक जिवंत काडतुस व गुन्हयात वापरलेली कार असा एकूण ९,३०,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन प्राथमिक तपासात ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीत यांचेवर यापुर्वी उत्तरप्रदेश, गुजरात मध्ये अशाच प्रकारचे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. नमुद आरोपीत यांना पुढील कारवाई करीता मांडवी पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) अति. कार्यभार पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि. प्रफुल्ल वाघ, नेमणूक मांडवी पोलीस ठाणे व गुन्हे शाखा कक्ष ३ चे पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. अभिजीत टेलर, शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सागर बारवकर, अशोक पाटील, मनोज चव्हाण, सचिन घेरे, पो.ना. मनोज सकपाळ, पो.अं. अश्विन पाटील, सुमित जाधव तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेमणूक सायबर सेल, म.सु.ब. किशोर राठोड यांनी पार पाडलेली आहे.



-------oooo--------